# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## दैनंदीन गुन्हे– दि. ०५/०२/२०२३

### खुनाचा प्रयत्न

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र ५६/२३ कलम ३०७ भादवी | नफफु याच्या भंगार दुकान समोर रेल्वे स्टेशन चौक अमरावती | दि ०३/०२/२०२३ चे २२.०० घ ता वेळ , माहिती मिळाली ता वेळ, दि ०३/०२/२०२२ चे १५.०० वा दा ता 04/02/023वेळ 06.18 वा | समाधान रघुनाथराव मालवे वय 42 वर्ष, व्यवसाय प्रॉपर्टी ब्रोकर रा, फलॉट नं 201 गणराया रेसिडन्सी, श्रीराम नगर राठी नगर अमरावती | सॅम वासनिक रा, बेलपुरा अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचे मिंत्र जयंत बंदीवान, आकाश हरले ,चेतन ठाकुर आणि आरोपी असे प्रॉपर्टीच्या व्यवहाराबाबत आपसात बोलत असतांना फिर्यादीने त्याचा मिंत्र जयंत बंदीवान याच्या फोन वरून जख्मी मिंत्र रोशन अशोकराव हिवसे याला फोन करून त्याच्या सोबत प्रॉपर्टीच्या व्यवहारा बाबत बोलायचे असल्याने त्याला शितल लॉज जवळ भेटण्यास बोलवले परंतु रोशन हिवसे याने फिर्यादीस म्हटले की तु ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी मि येतो असे म्हणुन रोशन हिवसे हा त्याची फोरव्हीलर गाडी क्र एम. एच. 16 बी. वाय. 1008 या गाडिने फिर्यादीच्या जवळ नफफुच्या भंगारच्या दुकाना समोर रेल्वे स्टेशन चौक अमरावती येथे आला व तेथे हजर असलेला चेतन ठाकुर हा सुध्दा रोशन हिवसे याचा मिंत्र असल्याने तो फिर्यादीला भेटण्या आधि चेतन ठाकुर जवळ गेला आणि त्याला ठाकुर म्हणुन आवाज दिला ठाकुर या नावाने आवाज दिल्याच्या राग येवुन आरोपीने त्याच्या जवळील चाकु रोशन हिवसे याच्या पोटात खुपसला आणि त्याची आपसात झटापटी झाली म्हणुन फिर्यादी आणि त्याच्या इतर मिंत्रांनी सदर दोघांचे भांडण सोडवले तेव्हा आरोपी तेथुन निघुन गेला आणि जख्मी रोशन हिवसे हा खाली पडला असल्याने त्याला उचलले असता त्याच्या पोटाला जखम हावुन रक्त निघत असल्याचे दिसले तसेच हाताला सुध्दा जखम झाल्याचे दिसले त्या मुळे जख्मी रोशन हिवसे याला त्याच्या फोरव्हीलर गाडित बसवुन उपचारा साठी डॉ. सावदेकर यांचे सुयश हॉस्पीटल येथे नेले व त्याला उपचारा साठी भरती केले आरोपी सॅम वासनीक याने त्याच्या जवळील चाकु जख्मी रोशन हिवसे याच्या पोटात खुपसुन त्याल जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला या बाबत फिर्यादी यांनी पोस्टे सिटी कोतवाली येथे समक्ष हजर राहुन रिपोर्ट दिला त्या वरून डि. ओ. सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल. |

**दुखापत :–**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो. स्टे. राजापेठ अप क्र. १२६/२०२३ कलम ३२४,५०४ ,५०६ भादंवि | फिर्यादीचे घरासमोर चिचफैल अमरावती | दि. ०४/०२/२०२३ चे ०८-०० वा. दरम्यान दा. ता. वेळ दि. ०४/०२/२०२३ चे १२.०३ वा. | मोहन गुलाबसिंग पवार वय ५५ वर्ष व्यवसाय लोहारी काम रा. चिचफैल अमरावती | बंडु उर्फ भालचंद मिश्रा रा. हमालपुरा अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी त्याचे घरासमोरिल आवारात झोपुन असतांना त्यचा मित्र बंडु मिश्रा वय ५५ वर्ष रा. हमालपुरा अमरावती हा तेथे आला व त्यांने फिर्यादीस उठवुन दारू पिणेकरिता पैसे मागितले तर फिर्यादीने माझे पैसे हरामाचे आहेत काय माझे कडे पैसै नाही असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला शिविगाळ केली तुला दाखवितो असे म्हणुन धमकी दिली व त्याने त्याचे खिशातुन ब्लेट काढुन फिर्यादीचे डावे गालावर मारून जख्मी केले . अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून व मेडीकल सर्चीवरून सदरचा गुन्हा दाखल |

**वाहन चोरी :–**

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नांदगाव पेट अप नं ५३/२३ कलम ३७९ भादवी | व-हाडी सावजी बार रहाटगाव चौक अमरावती | घ.ता.वेळ ३१/०१/२३ चे रात्री ०८/०० वा ते ०९/३० वा दरम्यान<br>दा.ता.वेळ<br>दि.४/२/२३ चे १६/०९ वा<br>दा.ता.वेळ ३/२/२३ चे १४/०६ वा | विक्रास भैय्यासाहेब साबळे वय ३७ वर्ष रा अर्जुन नगर अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे क नमुद घ.ता.वेळी वठिकाणी यातील फिर्यादी हे दि ३१-१-२३ रोजी ०८-०० वा त्याचा मित्र रंजीत ईश्वरकर यांचे सोबत व-हाडी सावजी बार ॲन्ड रेटॉरेन्ट रहाटगाव चौक अमरावती मध्ये त्याचे मोटारसायकल गाडीसह जेवन करण्या साठी गेले असता त्याची गाडी क्र एम एच २७ ए डब्लु २९९१ ही रेस्टॉरन्टचे बाहेर ऊभी करुन ठेवली होती व जेवन करुन अंदाजे रात्रीचे ०९-३० वा रेस्टॉरन्ट बाहेर येवुन पहले असता गाडी दिसुन आली नाही फि ची सिल्वर कलरची युनीकॉम गाडी क्र एम एच २७ ए डब्लु २९१९ चेचीस क्र एम ई ४केसी ०९ सीएम ८३८४२६३ ईजीन क्र केसी०९ई६३९३४५८ किं अं २५,००० रुपये ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फि च्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. १२७/२३ कलम ३७९ भादंवि | पो.स्टे. राजापेठ हद्दीत | दि. ०३/०२/२३ चे ०८.०० वा ते २०.०० वा. दरम्यान<br><br>दि. ०४/०२/२०२३ चे १३.०५ वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीचे मुलाने त्याची सायकल Hero Thom २६ T fs DDB कंपणीची सायकल ज्याचा Fr.No.HTL २२५३५ असा असुन कि. अंदाजे ४,०००/- रू. ची उभी करून ट्युशनला गेला व ट्युशन संपवुन तो परत आला असता च्या ठिकाणी सायकल उभी केली होती तिया ठिकाणी दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरीन नेली अशा फि. चे जबाणी रि. वरून सदरचा गुन्हा दाखल. |

**घरफोडी :-**

| **अ.क्र.** | **पो.ठाणे अप.क्र. व कलम** | **घटना स्थळ** | **गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ** | **फिर्यादीचो नांव पत्ता** | **आरोपीचे नाव व पत्ता** | **हकीकत** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| **१.** | बडनेरा<br>अप क्र. ११०/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८०, भादवी . | फिर्यादीचे राहते घर राठीनगर पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | दि. २०/०१/२३ चे १६/०० वा ते दि. २१/०१/२३ चे २०/३० वा दरम्यान<br>माहिती वेळ<br>०४/०२/२३ चे १४/३० वा. | नितीन रामभाउ बोदडे वय ३५ वर्ष ,धंदा नोकरी (गुडस गार्ड रेल्वे स्टेशन बडनेरा - भुसावळ डिवीजन) रा. राठीनगर | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की , यातील फि.हे घराला कुलूप लावुन ड्युटीवर गेले असता नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फि.च्या घराचे मुख्य दरवाज्याचा कुलूप तोडुन आत प्रवेश करून फि.च्या बेडरूममधील दरवाज्याच्या मागील कडीला अडकविलेल्या पॅंटच्या खिशातील ५०० रू.च्या ४० नोटा असे २०००० रू. व फि.च्या पत्नीच्या पर्समधील ५०० रू.च्या ५ नोटा असे २५०० रू. असा एकुण २२५०० रू. नगदी चोरून नेले. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दाखल वेळ दि. ०४/०२/२३ चे १५/४७ वा. | पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | | |

**विश्वासघात :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | नांदगाव पेठ अप.न. ५५/२०२३ कलम ४०६ भादवी | एम.आय. डि.सी . नांदगाव पेठ ता. जि. अमरावती | दि. ११/१०/२०२१ चे ११.०० वा. ते दि. ०४/०२/२०२३ चे २०.०० वा. पोवेतो दा. ता. वेळ दि. ०४/०२/२०२३ चे २०.२२ वा. | एक महिला | राजेंद्र राजपुत वय ४० वर्षे रा. जळगाव ता. जि. जळगाव | हकिकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी यांनी पोस्टे. ला तक्रार अर्ज दि. ०१/११/२०२२ रोजी दिला असुन त्यामध्ये आरोपी नामे राजेंद्र राजपुत वय ४० वर्ष व्यवसाय व्यापार रा. एम.आय.डी.सी. प्लॉट क्र. व्ही ९३ एम.आय. डी. सी. जळगाव ता. जि. जळगाव यांचे सोबत एक मशीनरी विकत घेण्याचे अनुषंगाने व्यवहार निश्चित करुन दि. ११/१०/२०२१ रोजी ५ लाख रुपये अग्रीम दिला. त्याचे पोच पावती घेतली दि. १९/०३/२०२२ रोजी जे.जे.एस.बी. बँके मार्फत आर.टि.जी.एस. द्वारे पुन्हा ५ लाख रुपये आरोपीस मशीन तयार करणे करिता दिले. तसेच ऋषी प्लॉस्टो टेक कंपनी उभारणे करिता फि. यांनी युनीयन बँक ऑफ इंडिया शाखा ईर्विन चौक अमरावती मार्फत १६ लाख रुपयाचे कर्ज मंजुर करुन ती रक्कम दि. २७/०७/२०२२ रोजी आरोपी राजेंद्र राजपुत यांचे खातेवर ट्रान्सफर केली त्यानंतर आरोपी द्वारा ४५ दिवसाचे आत मशीन ऋषी प्लॉस्टे टेक कंपनी एम.आय. डी. सी नांदगाव पेठ येथे लावुन देईल असा व्यवहार ठरला होता. परंतु आज पावेतो आरोपी यांनी सदरची मशीन तयार करुन लावुन दिली नाही व घेतलेली रक्कम परत सुध्दा केली नाही. तसेच चौकशीस प्रतिसाद सुध्दा दिला नाही आरोपी ने अप्रामाणिकपणे फिर्यादीच्या पैशाचे नुकसान केले असुन स्वताचा गैरकायदेशीर लाभ करुन घेतला आहे आणि फिर्यादी चे गैरकायदेशीर नुकसान केले आहे. अशा फिर्यादीचे लेखी तक्रार व चौकशीअंती सदरचा गुन्हा दाखल . |

**पळवुण नेणे:-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटानास्थळ | गु.घटाा ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो ांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | नागपुरी गेट कलम ५७/२०२३कलम ३६३ भादवी | रतनगंज अमरावती | ०३/२/२०२३चे दूपारी ०३/००ते ४/००वा दरम्यान ०४/२/२०२३ ०२.०९ | एक महिला | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि अशा यातील फीर्यादी हि दूपार ०२/०० वा मोहल्यात भांडे घासण्याचे कामा कररता गेली व दूपारी ०४/०० वा कामावरून घरी परत आली असता तिचा मूलगाा नामे हा घरी दिसून आला नाही म्हणून अदयाप पावेतो मोहल्लयात तसेच आसपासचे परीसरात रेल्वे स्टेशन एच टी डेंपो येथे शोध घेतला मिळून आला नाही तसेच ओळखिचे लोकानां फोन करून विचारपूस केले असता काहीच माहीती मिळू शकली नाही म्हणून फीर्यादीचे मूलास यास कोणीतरी अज्ञात चोरटयाने फूस लावून पळवून नेले अशा सेशंय असल्याने तिने पो स्टे ला रीर्पोट दिला अशा फीर्यादीचे जबानी रीर्पोट वरून सदरचा गून्हा दाखल. |

## इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे वलगाव ५२/२०२३ कलम २८३ भादवि. प्रमाने | कामुजा फाटा | ०४/०२/२०२३ चे १६/०० वा. माहीती दि.०४/०२/२३ चे १६/१५ वा. दाखल दि. ०४/०२/२०२३ चे १७/३१ वा. | ASI दादु दहिकर ब.न.९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | आट्रो क्र. MH ४९ AR ७५१० रा.बाजार पुरा वलगाव ता.जि.अम. | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील आट्रो क्र. MH ४९AR ७५१० रा.बाजार पुरा वलगाव ता.जि.अम. चे चालकाने आपले ताब्यातील तिन चाकी आट्रो आमरस्तेवर उभा करुन लाकांच्या जाणा-या येणा-या रहदारीस अळथडा निर्मान होवुन लोकाच्या जिवीतास धोका निर्मान होईल अशा पध्दतिने आपला आट्रो आमरोडवर उभा केल्याने सदर आट्रो चालकाचे कृत्य कलम २८३ भादवि प्रमाने होत असल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल . |
| २ | पोस्टे वलगाव ५३/२०२३ कलम २८३ भादवि. प्रमाने | कामुजा फाटा | ०४/०२/२०२३ चे १६/३० वा. माहीती दि.०४/०२/२३ चे १६/४० वा. दाखल दि. ०४/०२/२०२३ चे १७/३४ वा. | ASI दादु दहिकर ब.न.९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | आट्रो क्र. MH २७ BW ५०४० रा.समता नगर वलगाव ता.जि.अम. | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील आट्रो क्र. MH २७ BW ५०४० रा. समता नगर वलगाव ता.जि.अम. चे चालकाने आपले ताब्यातील तिन चाकी आट्रो आमरस्तेवर उभा करुन लाकांच्या जाणा-या येणा-या रहदारीस अळथडा निर्मान होवुन लोकाच्या जिवीतास धोका निर्मान होईल अशा पध्दतिने आपला आट्रो आमरोडवर उभा केल्याने सदर आट्रो चालकाचे कृत्य कलम २८३ भादवि प्रमाने होत असल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल . |

## अकस्मात मृत्युः-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बडनेरा. मर्ग क्र. ०८/२३ कलम १७४ जा. फौ. | मा. पो.उप.आ. परि -१, अम. शहर. | सिपना कॉलेज जवळ, निंभोरा, बडनेरा, अमरावती. | विजेता राहुल गवई, वय ३२ वर्षे, रा. सिपना कॉलेज जवळ, निंभोरा, बडनेरा, अमरावती. | म.ना.पो.कॉ. निलीमा बिसने, ब.न. १४६८ पो.स्टे. बडनेरा, अमरावती शहर. | रोड अपघातामुळे जखमी होऊन मृत्यु. | पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथुन प्राप्त मर्ग क्र. ००/२३ कलम १७४ जा. फौ. प्रमाणे हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील मृतक ही दि. २८.०१.२३ रोजी दुचाकी वाहन चालवित असतांना समाज कल्याण, निंभोरा नगर, बडनेरा येथे गतीरोधकामुळे खाली पडल्याने तिच्या डोक्याला व मेंदुला इजा झाल्याने तिला उपचाराकरिता पी.डी.एम.सी. दवाखाना, अमरावती येथे भरती केले असता उपचारा दरम्यान ती दि. ३१.०१.२३ चे ०१.३० वा. मरण पावली. अशा प्राप्त मर्ग डायरीवरून पो.स्टे. बडनेरा, अम. शहर येथे सदरचा मर्ग दाखल . |

## प्रोव्हीशन. रेड :—

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नांदगाव पेठ | अप नं ५४/२३ कलम ६५ ई म.दा.का | ग्राम वाडकी ता जि | गुन्हा घडला ता.वेळ ४-१-२३ चे १८-०० | गुन्हा दा. ता.वेळ दि ४-१-२३ चे१९-३९ | पोउपनी गजानन लोकडे वय २८ वर्ष पोस्टे नांदगावपेठ अम शहर | प्रमोद प्रभाकर आठवले वय ४० वर्ष रा वाळकी ता जि अमरावती | अधिकारी भेट - पोउपनी लोकडे दि. ०४/०२/२०२३ चे १८.०० ते १९.०० | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि ४-२२३ रोजी १८-०० वा दरम्यान गुप्त बातमी दारा कडुन खात्री लायक माहीती मिळाली की एक ग्राम वाळकी येथे विना परवाना अवैध्य रित्या देशी ची विक्री करीत आहे अशा मिळाले ल्या खबरी प्रमाणे प्रो. रेड कली असता दारु विक्री करणारा ईसम आम्हाला अवेधरित्या देशी दारु ची विक्री करतांना जागीच मिळुन आला. त्याला पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रमोद प्रभाकर आठवले वय ४० वर्ष रा वाळकी ता जि अमरावती असे सांगीतले त्याच्या ताब्यातुन एका नॉयलान च्या पिशवीतुन 180 एम |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | एल च्या देशी बॉंबी संत्रा १० नग कि अं ८०० रु चा मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालातुन एक १८० एम.एल काचेच्या शीशीमध्ये देशी दारु सॅंम्पल करिता वेगळी काढुन त्यावर पंचाचे आमचे सहीचे कागदी लेबल लावुन लाखेचे जागीच सिल केले . अशी फिर्यादी चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गन्हा दाखल . |
| २ | नांदगावपेठ | अप नं ५६/२३ कलम ६५ ई म.दा.का | रहाटगाव ता.जि. अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ ४-१-२३ चे २०-०० | गुन्हा दा. ता.वेळ दि ४-१-२३ च २२.१४ वा. | पो.उपनि आकाश वाठोरे वय २९ वर्ष पोस्टे नांदगावपेठ अम शहर मोनं ९६५७००४६५२ | सर्वेश अशोक जयस्वाल वय २० वर्ष रा. लक्ष्मी नगर ता. जि. अमरावती | अधिकारी भेट - पो.उपनी आकाश वाठोरे पोस्टे. नांदगाव पेठ दि. ०४/०२/२०२३ चे २०.०० वा. | हकिकत अशाप्रकारे आहेकी दि. ०४/०२/२०२३ चे सकाळी ०९.०० वा. ते २१.०० वा. डे ऑफीसर डयुटी असतांना पोस्टे. ला दुरध्वनी वर माहीती मिळाली की रहाटगाव येथे एक इसम विना परवाना अवैध्य रित्या देशी ची विक्री करीत आहे अशा मिळालेल्या माहीती वरुन आम्ही सोबत पोना ८३४ सह प्रो. रेड कली असता दारु विक्री करणारा ईसम आम्हाला अवेधरित्या देशी दारु ची विक्री करतांना जागीच मिळुन आला. त्याला पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सर्वेश अशोक जयस्वाल वय २० वर्ष रा. लक्ष्मी नगर असे सांगीतले त्याच्या ताब्यातुन एका प्लॉस्टीकच्या च्या पिशवीतुन 180 एम एल च्या संजीवनी बॉंबी संत्रा ६ नग कि अं ४८० व ओपो ऐ ७ कंपनीचा मोबाईल कि. ८०००/- असा एकुन ८४८०/- रु चा माल मिळुन आला. सदर मुद्देमालातुन एक १८० एम.एल काचेच्या शीशीमध्ये देशी दारु सॅंम्पल करिता वेगळी काढुन त्यावर पंचाचे आमचे सहीचे कागदी लेबल लावुन लाखेचे जागीच सिल केले . अशी फिर्यादी चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गन्हा दाखल . |